# <u>दिवाणी चौकशी अर्ज क. १८७३/२०२२ मधील</u>
# <u>नि.१ वरील आदेश</u>

श्रीमती शारदा प्रविण मोरे वगैरे २ ... अर्जदार

प्रस्तूत अर्ज मुंबई रेग्युलेशन VIII, १८२७ अन्वये वारस दाखला मिळणेकरीता केला आहे.

२) अर्जातील कथन असे की, मयत प्रविण रामचंद्र मोरे याची अर्जदार क्र. १ ही पत्नी, अर्जदार क्र. २ हा मुलगा आणि अर्जदार क्र. ३ ही मुलगी असे कायदेशीर वारस आहेत. मयत प्रविण रामचंद्र मोरे हा दि. २२/०५/२०२१ रोजी जनरल हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई येथे मयत झालेला आहे. तसेच मयताची आई वैजयंताबाई रामचंद्र मोरे ही पाटण, सातारा येथे ब-याच वर्षापूर्वी मयत झालेली आहे.

३) अर्जदार यांचे व्यतिरिक्त मयत प्रविण रामचंद्र मोरे यास कोणीही वारस नाहीत. अर्जदारांनी अन्य कोणत्याही कोर्टात अशा प्रकारचा वारस दाखला मिळण्याकरीता अर्ज केलेला नाही.

४) तसेच जाहिरनामा **(निशाणी ७)** प्रमाणे दिनांक ०६/०१/२०२३ रोजी आणि दैनिक "रायगड नगरी" मध्ये दि. ०४/१२/२०२२ रोजी जाहीर नोटीस **(निशाणी १२ वरील यादीसोबत दाखल)** दिल्यानंतर ३० दिवसांचे आत कोणीही हरकत घेतलेली नाही.

५) वरील कथनास पुष्टी देण्याकरीता अर्जदारांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र **(निशाणी ९)**, मयत प्रविण रामचंद्र मोरे याच्या मृत्यू दाखल्याची मूळ प्रत, अर्जदारांच्या ओळखपत्राच्या व्हेरिफाईड प्रत,

**(निशाणी ४ वरील कागदपत्रांच्या यादीसोबत दाखल)** याप्रमाणे अर्जदारांनी कागदपत्रं दाखल केलेली आहेत.

६) वरील सर्व बाबींचे विवेचन केल्यानंतर असे स्पष्ट होते की, अर्जदार हे मयत प्रविण रामचंद्र मोरे याचे कायदेशीर वारस असून सदर अर्जाला कोणीही हरकत घेतलेली नाही. म्हणुन अर्ज मंजूर करून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

:: **<u>आ दे श</u>** ::

| | |
|---|---|
| १) | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २) | अर्जदार हे मयत प्रविण रामचंद्र मोरे याचे वारस असून त्यांच्या नावे वारस दाखला मिळकतीच्या चालू प्रचलित बाजारमूल्यावर आवश्यक तो मुद्रांक शुल्क दिल्यावर देण्यात यावा. |
| ३) | अर्जदारांनी मुद्रांक शुल्क या आदेशापासुन ३० दिवसांचे आत भरावा. |

**पनवेल.**
**दिनांक– २४/०४/२०२३.**

**(ए. एम. मुजावर)**
**सह दिवाणी न्यायाधीश,**
**व.स्तर, पनवेल.**